# लोकजागृती (Community Mobization)

## १) मीना राजू मंचः-

- शिक्षणाच्या प्रवाहात मुलींना आणण्यासाठी विशेष पटनोंदणी मोहीम आयोजित करणे.
- मुलींच्या शाळेतील नियमित उपस्थितीचे महत्त्व पालकांना समजून देणे,
- गळती झालेल्या मुलींना शाळेत दाखल करण्यासाठी पाठपुरावा करणे,
- मुलींच्या शिक्षणातील समस्या सोडविण्यासाठी महिला गट,ग्रामशिक्षण समिती, माता-पालक संघ यांचा समावेश करुन घेणे,
- स्त्री-पुरुष समानतेचे मूल्य बिंबविण्यासाठी मुलींच्या शिक्षणाला विशेष गती देण्याकरीता विशेष कार्यक्रमांचे आयोजन करणे,
- ज्या मुलींनी किशोरी अवस्थेत शाळा सोडली आहे त्यांना परत शाळेत आणण्याकरिता किशोरी शिबिरांचे आयोजन करणे,
- जीवन कौशल्य शिक्षणावरआधारीत खास व्यवसाय प्रशिक्षण शिबिरांचे आयोजन करणे.
- मीना - राजू मंच उपक्रम मार्गदर्शिकेतील घटकांचे प्रभावी अध्यापन करणे.
- मीना -राजू रेडिओ कार्यक्रमाची अंमलबजावणी करणे.
- मीना-राजू मंच सदस्यांच्या मदतीने विविध उपक्रमांचे शाळा तसेच गावपातळीवर आयोजन करणे.

## १. बेटी बचाओ, बेटी पढाओ कार्यक्रम :-

सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षामध्ये बेटी बचाओ, बेटी पढाओ उपक्रम यशस्वीरित्या राबवणे त्यानुसार मुलींचा जन्मदर घटू नये, त्यांच्या शिक्षणातील प्रमाण वाढावे म्हणून भारत सरकारने बेटी बचाओ, बेटी पढाओ हा महत्वकांक्षी कार्यक्रम सुरु केला आहे. जिल्हा स्तरावरुन ज्या उच्च प्राथमिक शाळेमध्ये मुले व मुली यांच्या संख्येत तफावत आहे व मुलांपेक्षा मुलींचे शाळेत येण्याचे प्रमाण कमी आहे अशा शाळास्तरावर हा उपक्रम राबविणे.

## २. चित्ररथाचे आयोजनः-

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम,२००९ ची अंमलबजावणी करण्यासाठी सर्व स्तरांपर्यंत त्याची माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता राष्ट्रीय सणाचे औचित्य साधून दिनांक २६ जानेवारी,२०१६ या दिवशी गट साधन केंद्रस्तरावर चित्ररथाचे आयोजन करणे. या चित्ररथाद्वारा शिक्षण हक्क कायदयातील विविध तरतूदी तसेच बालकांचा हक्का संदर्भातील माहिती जनसामान्यांपर्यंत पोहचविणे.

## ३. लेक शिकवा अभियानः-

शैक्षणिक दृष्टया मागास गटामध्ये शिक्षणाचा प्रसार करणे,विशेषतः मुलींचे शिक्षणातील प्रमाणातील वाढ करुन त्यांची प्राथमिक शिक्षणातील टिकवणूक सातत्यपूर्ण ठेवण्यासाठी लेक शिकवा अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करणे.त्या अंतर्गत विविध उपक्रमांची अंमलबजावणी करण्यासाठी राज्यातील शैक्षणिकदृष्टया मागास व मुलींची शिक्षणातील गळती जास्त असलेल्या गटांमध्ये पालक व समाजाच्या सक्रीय सहभागातून मुलींच्या शिक्षणाचा प्रचार व प्रसार करणे.